N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** चांदुर रेल्वे

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0081 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/02/2023 01:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 16/02/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/02/2023
   **Time From (वेळेपासून):** 17:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 16/02/2023 **Time (वेळ):** 17:43 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/02/2023 01:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 00.2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** रेकर्डरुम तहसिल कार्यालय चांद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): भुषन रामचंद्र गवळी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 05/01/1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | फ्लट नंएफ/1,साई सागर ईन्क्वे,टावर लाईन जवळ,सर्वज्ञ विहार,शेगाव - राहटगाव रोड,अमरावती, मुपो परसोडा रोड,आष्टी वर्धा,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | फ्लट नंएफ/1,साई सागर ईन्क्वे,टावर लाईन जवळ,सर्वज्ञ विहार,शेगाव - राहटगाव रोड,अमरावती, मुपो परसोडा रोड,आष्टी वर्धा,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कैलास शंकर पुरी | | | 1. घर नं78 समर्थ,मंदीराजवळ मिरा छानमानी नगर, धामणगाव रेल्वे अमरावती ,दत्तापूर, अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 100 रुपये दराच्या 03 चलनी नोटा | 300.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

300.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
मी भुषन रामचंद्र गवळी,वय-27 वर्ष ,व्यवसाय-मजुरी/अटर्नी, रा.फ्लॅट नं.एफ/1,साई सागर ईन्क्वेव नं.2,टावर लाईन जवळ,सर्वज्ञ विहार,शेगाव -राहटगाव रोड,अमरावती, मुळगाव मु.पो.परसोडा रोड,पेठ अहमदपूर,आष्टी ,ता. आष्टी जि.वर्धा मो.9764809998

मी समक्ष ॲन्टी करप्षन ब्युरो,अमरावती कार्यालयात हजर असून, मी वर नमुदप्रमाणे असुन, मी दि. 16/02/23 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती येथील पो.नि.श्री.सतिष उमरे यांची भेट घेवून माझे तक्रारीबाबत माहिती दिली. त्यावरुन पो.नि.उमरे साहेबांनी म.रा.वि.पारेषन कं.अमरावती चे अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यस्था विभाग,येथे पत्र देवून पंच क्र.1 श्री.सैय्यद ईमरान व पंच क्र.2 सुनिल खंदारे यांना उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर त्यांनी माझा परिचय दोन्ही पंचांना करुन दिला तसेच त्यांचा देखील परिचय मला करुन दिला. तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, अमरावती येथील स्टाफचा परिचय करुन दिला.त्यावेळी मी त्यांना माझी लेखी तक्रार दाखविली व ती तक्रार सर्वासमक्ष थोडक्यात तोंडी सांगीतली. '' मी भुषन रामचंद्र गवळी, समक्ष ॲन्टी करप्शन कार्यलय,अमरावती,येथे हजर राहून लेखी तक्रार देतो की, मी वरील पत्यावर कुटूंबासह राहणेस असून, मी मजुरीचे काम तसेच ॲड. रोषन धांदे यांचा अटर्नी म्हणून काम करतो. त्याच्याच कायदेशीर कामाकरीता मी तहसिल कार्यालय चांदूर रेल्वे येथील रेकॉर्ड रुम येथे काही दस्त मिळण्याकरीता अर्ज दिला आहे. सदर दस्ताकरीता लागणारी कायदेषीर फी मी आगाउ मध्ये रेकॉर्ड रुम चे लिपीक श्री.पुरी यांचेकडे जमा केलेली आहे.
दि.07/02/2023 रोजी सदरचे दस्त घेण्याकरीता मी तहसिल कार्यालय, चांदूर रेल्वे येथे गेलो असता,श्री.पुरी यांनी मला 400/-रू.दयावे लागेल नाहीतर दस्त तुला लवकर मिळणार नाही असे सांगीतले, त्यावेळी मी त्यांना हो म्हणून त्या ठिकाणाहून निघून आलो.
परंतू मला श्री.पुरी याना 400/-रु.लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने, त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करीता आपणाकडे तक्रार देत आहे. तहसिल कार्यालय चांदूर रेल्वे येथील श्री.पुरी यांचे सोबत माझा कोणताही आर्थिक व्यवहार नसुन, त्यांच्याशी माझा कोणत्याही प्रकारचा वाद नाही.अशी सविस्तर लेखी तक्रार दिली.त्यानंतर पो.नि. सतिष उमरे यांनी मला व दोन्ही पंचांना महत्वाच्या सुचना देवून पडताळणीपुर्व पंचनामा कार्यवाही करण्यात आली.

त्यानंतर आम्ही सर्वजन चांदुर रेल्वे करिता रवाना झालो.चांदुर रेल्वे जवळ पोहचल्यानंतर आम्ही सर्वजन चांदुररेल्वे ते कार्ला रोडने एका निर्जनस्थळी थांबलो.त्यांनतर पोनि.उमरे यांनी मला व पंचाना पडताळणीपुर्व पंचनामातील सुचनांची उजळणी करून देवून,माझेजवळ डिजीटल व्हाईस रेकॉर्डवर देवून पंच क्र.1 श्री.सैय्यद इमराण यांचेसह चांदुर रेल्वे तहसिल कार्यालय,येथे दुचाकी वाहनाने गेलो.,तेथे पोहचल्यानंतर मी व पंच क्र.1 श्री. सैय्यद तहसिल कार्यालयामध्ये कर्मचारी श्री.पुरी यांची भेट घेण्याकरीता कार्यालयात गेलो.त्यावेळेस रेकॉर्ड रूममध्ये लिपीक श्री.पूरी हजर होते. त्यावेळी मी श्री.पुरी यांना माझे अर्जप्रमाणे मागीतलेले कागदपत्रांबाबत विचारपूस केली असता, त्यांनी कागदपत्रे तयार असल्याचे सांगुन, माझे मागणीप्रमाणे ची कागदपत्रे माझे हाती देवून, मला हाताने पैसे मागणी बाबत इषाऱ्याने विचारणा करून, "तु अतुलला भेटला नाही काय?" असे विचारले. त्यावर मी त्यांना "साहेब 400 रूपये जास्त होतात,मागचे वेळी 400 रूपये दिलेत.दरवेळी 400 रूपये जास्त होतात, जरा कमी करा." असे म्हणालो असता, श्री.पुरी मला म्हणाले की, " ठिक आहे. तुला जे दयायचे ते दे, मी काही नाराज होणार नाही, तुझे माझे नेहमीचेच काम आहे, तुला जे दयायचे ते दे. " असे म्हणालेत. त्यावर मी त्यांना " साहेब 400 रूपये पेक्षा कमी करा माझे नेहमीच काम पडते. " असे म्हणालो असता, श्री.पुरी मला " ठिक आहे. तेवढेच दे." असे म्हणालेत.



Scanned with CamScanner

त्यानंतर मी त्यांचेसोबत काहीवेळ माझे कामाबाबत चर्चा केली व त्यांचेकडून माझे कागदपत्रे घेवून मी व पंच कार्यालयातून बाहेर निघुन आलो.त्यानंतर आम्ही तेथून दुचाकीने पोनि.उमरे व पथक जेथे थांबलेत त्या ठिकाणी परत आलो असता पोना/राठोड यांनी पंचासमक्ष माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. अशाप्रकारे तहसिल कार्यालय चांदुर रेल्वे येथील लिपीक श्री.पुरी यांनी मला माझे अर्जाप्रमाणेचे कागदपत्रे देण्याकरीता 400/- रु. लाचेची मागणी पंचासमक्ष केल्याचे निष्पन्न झाले. सदरबाबत सविस्तर पडताळणी पंचनामाची कार्यवाही करण्यात आली.

त्यानंतर पो.नि.उमरे यांनी आम्हाला लागलीच सापळापुर्व कारवाई करण्याचे सांगुन,मला लिपीक श्री.पुरी यांना देण्याकरीता 400/-रु.लाच रक्कम हजर करण्यास सांगितले असता,मी माझेकडील 100 रुपये दराच्या 03 नोटा हजर केल्या व ऐवढेच पैसे असल्याचे सांगितले.त्यावेळी पंच क्र.2 श्री.खंदारे यांनी त्या नोटा घेतल्या व त्यांचे नंबर कागदावर लिहले, त्यावेळी पोनि.उमरे यांनी सांगितले की,आता सदर नोटांना अॅन्थ्रोसीन पावडर लावणार आहोत. त्यानंतर पोका. /वैभव जायले यांनी आम्हाला अॅन्थ्रोसीन पावडर व अट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती देवून,नोटांना अॅन्थ्रोसीन पावडर लावण्यात येवून मला व दोन्ही पंचांना सापळा कारवाई बाबत महत्वाच्या सुचना देण्यात आला. त्यानंतर पोनि.उमरे यांनी मला व पंचांना सांगितले की,आता आपण तहसिलदार कार्यालय,चांदुर रेल्वे,जि.अमरावती येथे जावुन तेथील लिपीक श्री.पुरी यांचेविरुध्द सापळा आयोजित करणार आहोत. त्यानंतर पोना/राठोड यांनी नविन मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकून ते सुरु करुन माझे जवळ दिले व मी आणि पंच क्र.1 श्री.सैय्यद असे दुचाकीने रवाना झालो व सोबतच सापळा कारवाईतील सर्व सदस्यही शासकीय वाहनाने तहसिल कार्यालय, चांदुररेल्वे कार्यालय येथे आलेत व कार्यालयाचे आवारात आजुबाजूला थांबले.

त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.सैय्यद असे तहसिल कार्यालय, चांदुररेल्वे चे कार्यालयात गेलो असता, रेकॉर्डरुमध्ये लिपीक कर्मचारी श्री.पुरी खुर्चीवर बसले होते. त्यानंतर मी श्री.पुरी यांचेजवळ गेलो असता, त्यांनी मला पाहताच पैशाबाबत हाताने इशारा केला. त्यानंतर मी त्यांना माझे शर्टचे डावेबाजुचे खिशातुन लाच रक्कम रुपये 300/-रू. काढून माझे उजव्या हाताने श्री.पुरी यांना देण्यासाठी काढले व श्री.पुरी यांना बोललो "सध्याचं एवढेच आहेत सध्याचे तीनशे देतो,पुढच्या वेळेस करून टाकिन" त्यावर श्री.पुरी यांनी मला लाचेची रक्कम ते बसत असलेल्या टेबलकडे हाताने ईशारा करून बोलले "तेच्यात ठेव तेच्यात.. दस्तीच्या खाली ठेउन दे म्हटलं .....ठेउन देणं पटकन". त्यानंतर मी लाच रक्कम श्री.पुरी बसत असलेल्या टेबलावरील फाईल व दस्तीच्या मध्ये ठेवली व त्यानंतर लाच रक्कम स्विकारण्याबाबतचा नियोजित इशारा केला. त्यानंतर पो.नि.श्री.सतीष उमरे हे त्याठिकाणी सापळा पथकासह आले व त्यांनी कर्मचारी श्री.पुरी यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पो.ना.राठोड यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केले.

त्यानंतर पो.नि.सतिष उमरे यांनी श्री. पुरी यांना त्यांचा परिचय दिला व सापळा पथकातील पंच तसेच कर्मचारी यांचे परिचय देवून कर्मचारी पुरी यांनी माझेकडून स्विकारलेली 300/- रुपये लाच रक्कमेबाबत कर्मचारी पुरी यांना विचारणा केली असता त्यांनी त्यांनी सदर लाच रक्कम श्री.पुरी बसत असलेल्या टेबलावरील फाईल व दस्तीच्या मध्ये असलेबाबत सांगितले सदर लाच रक्कम पोनि.उमरे यांच्या सुचनेनुसार पंचानी ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि. सतिष उमरे यांनी कर्मचारी पुरी यांना त्यांचे नाव, पद, व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री.कैलास शकर पुरी वय-57वर्षे, पद-अव्वल कारकुन, तहसील कार्यालय चांदुर रेल्वे जि.अमरावती रा.घर नं.78 समर्थ मंदीराजवळ मिरा छानगानी नगर धामणगाव रेल्वे अमरावती असे सांगितले त्यानंतर पुढिल कारवाई करिता आम्ही सर्व अॅन्टी करप्षन ब्युरो, कार्यालय अमरावती येथे आलो व उमरे साहेबांनी केलेल्या कार्यवाहीचा सवस्तिर पंचनामा केला. लोकसेवक श्री.कैलास शंकर पुरी वय-57 वर्षे, पद-अव्वल कारकुन, तहसील कार्यालय चांदुर रेल्वे जि.अमरावती रा.घर नं.78 समर्थ मंदीराजवळ मिरा छानगानी नगर धामणगाव रेल्वे अमरावती यांनी पदाचा दुरुपयोग करून स्वतःचे आर्थीक फायदयासाठी पडताळणी कार्यवाही दरम्यान मी केलेल्या अर्जाच्या अनुशंगाने रेकॉर्ड रूममधील दस्त देण्याकरीता 400/-रू.लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. तसेच आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान माझेकडून 300/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना लाच रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले म्हणून त्यांचे विरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल प्रमाणे फिर्याद संगणकावर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढूण मला दाखविली, सदर फिर्याद मी वाचुन पाहली असता घडलेल्या वस्तुस्थितीप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ANIL MUKUNDRAO PAWAR(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ANIL MUKUNDRAO P

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):



Scanned with CamScanner